**R.C.C. २६८/२०१३**

**नि. ६२**

सरकार **तर्फे साक्षीदार कमांक** ३ **याची जबानी**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः—**

**माझे नांव** किरण दिलीप कदम

**वय सुमारे** ३८ **वर्षे** **व्यवसाय** नोकरी

**निवासस्थान** बारामती **ता.**बारामती **जि.**पुणे

**सर तपासणी**

**Examination-in-chief**

**सरकार तर्फे ॲड. एस.आय.सावंत यांचे कडुन**

माझे मामाची घरगुती केसमध्ये माझे आईचे नांव होते त्यामुळे मी वाठार पोलिस ठाणे येथे आलो होतो. त्यावेळी माझे सोबत माझे मामा आनंदराव सकुंडे हे होते. पोलिसांनी मला कागदावर सही करणेस सांगितली त्यामुळे मी कागदावर सही केली. मी किती कागदावर सही केली हे मला सांगता येणार नाही. साक्षीदारास दि.१४/०५/२०१३ रोजीचे दोन पंचनामे दाखविणेत आले. दोन्ही पंचनामेवर माझे सहया आहेत. साक्षीदारास जप्त दोन काठया दाखविणेत आल्या. या काठया माझे समक्ष जप्त केल्या नाहीत.

साक्षीदार अभियोग पक्षास पुरक साक्ष देत नसल्यामुळे त्याचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात आली.

**सरकार तर्फे उलटतपास एस.आय.सावंत सरकारी वकील,**

हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी पोलिस ठाणे येथे सचिन भागवत व संदीप भागवत असे दोन आरोपी उपस्थित होते, सचिन भागवत यांनी एक कळकाचे दांडके, तीन पेराचे १९इंच लांबीचे व संदीप भागवत याने

एक निरगुडीचे दांडके ३९ इंच लांबीचे असे आमचे समोर हजर केले, सदरची दोन्ही दांडके वेगवेगळे पंचनामेने आमचे समक्ष जप्त केले, सदरचे दोन्ही पंचनामे वाचुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मदत करणेसाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी तर्फे उलटतपास पी.एस.भोईटे यांचेकडुन**

उलटतपास नाकारला

श्रवणोत्तर स्विकृत

(जी.एस.माने)
तारीख : २४/०२/२०२० प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव